
तेनाली रामच्या
रंजक कथा
ज्ञानेश्वर कुलकर्णी
परी प्रकाशन

**तेनालीरामच्या रंजक कथा**

◆ ——————————

© सुरक्षित

◆ ——————————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ——————————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ——————————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ——————————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ——————————

**किंमत :**
रुपये १४०/-

## अनुक्रमणिका

१. चतुर तेनाली राम / ३
२. मृत्यूच्या तावडीतून सुटका / ९
३. तेनाली राम विदूषक झाला / १६
४. रंगांचा उत्सव / २३
५. चोरांचा बंदोबस्त / २९
६. चोरांची फजिती / ३३
७. एक चित्रकार / ३७
८. अपराध / ४३
९. पितळ उघडे पडले / ४७
१०. दोष काढणे सोपे / ५२
११. विहिरींची चोरी / ५६
१२. निरपराधी / ६०
१३. जालीम चूर्ण / ६५
१४. चुकीचा मार्ग / ६९
१५. गर्वाचे घर खाली / ७३
१६. स्वप्ननगरी आणि ... / ७६
१७. सर्वात मौल्यवान काय ? / ८५
१८. चंदनचोर / ९०
१९. योग्य निवड / ९३
२०. विचित्र आरसा / ९७
२१. योग्य उपाय / १०३
२२. खरे अपराधी / १०६
२३. न्याय मिळाला / ११२
२४. रंगीत पक्षी / ११८
२५. तेनाली रामची परीक्षा / १२२
२६. खोटा पंडित / १२६
२७. प्रामाणिक चोर / १३०
२८. पोपट बोलाया लागला / १३६
२९. हिऱ्यांची चोरी / १४१
३०. पक्षी स्वतंत्र झाले / १४५
३१. सोन्याचा हंडा / १४८
३२. जशास तसे / १५३
३३. कपटी नेमबाज / १६३
३४. मण्यांची चोरी / १६७
३५. डाव उलटला / १७४
३६. नको असलेले बक्षीस / १७७
३७. तलावाचे रक्षण / १८०
३८. राणीचा राग पळाला / १८६

✦✦

# चतुर तेनाली राम



तेनाली राम याचे नाव ऐकल्याबरोबर आपल्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमटते. तेनाली राम एक बुद्धिमान माणूस होता. तो हजरजबाबी होता. विनोद करण्यात त्याचा हातखंडा होता. त्याच्या अंगी नाना कला होत्या. आपल्याकडे एक म्हण आहे 'वेश साधा-भोळा पण अंगी नाना कला.' तेनाली राम यांना ही गोष्ट लागू पडते.

तेनाली राम हा एक ब्राह्मण होता. त्याचे नाव रामकृष्ण असे होते. रामकृष्ण तेनाली या गावात राहत होता. त्यावरूनच पुढे तो तेनाली राम या नावाने ओळखला जाऊ लागला.

तेनाली राम या गावाहून त्या गावी या नगरातून दुसऱ्या नगरात असा भटकत होता. तो शिकत होता; पण त्याचे खरे शिक्षण अनुभवामुळेच झाले होते. तो वेगवेगळ्या ठिकाणी भटकत होता. वेगवेगळ्या लोकांना भेटत होता. त्यांच्यात मिसळत होता. गप्पागोष्टी करीत होता. त्यांच्या अडचणी आपल्या हुशारीने सोडवण्याचा प्रयत्न करीत होता.

गरिबाविषयी तेनाली रामला दया वाटत होती. त्याला न्याय पसंत होता. एखाद्या माणसाची लबाडी इतरांना दाखवून देण्यात त्याला आनंद वाटत होता. एखादी व्यक्ती ढोंग करू लागली तर ते ढोंग तेनाली राम उघड करायचा. त्या ढोंगी माणसाचा खरा चेहरा जनतेपुढे आणायचा.

एकदा पहाटे तो झोपेतून खडबडून उठला. प्रथम त्याला वाटले, आपणाला स्वप्न पडले. नंतर त्याला वाटले आपणाला प्रत्यक्ष देवीने दर्शन दिले. पुन्हा त्याला असा भास झाल्यासारखे वाटले. त्याला असे वाटले की, आपणाला देवीने विदूषक बनण्याचा आशीर्वाद दिला आहे. तो त्या गोष्टीचाच विचार करू लागला होता.

त्यावेळी विजयनगरचा राजा कृष्णदेव राय होता. तेनाली राम यांनी अनेक लोकांकडून ऐकले होते की, राजा कृष्णदेवराय याचा दरबार खूप मोठा असतो. राजा बुद्धिमान आणि कलावंत लोकांची कदर करतो.

आता तेनालीराम याने कृष्णदेवराय यांच्या दरबारात जायचे ठरवले. आपण तेथेच विदूषक म्हणून काम करावे असे त्याच्या मनाने निश्चित केले होते. तो विजयनगरच्या मार्गाने चालू लागला होता. तो विजयनगरमध्ये पोहोचला. विजयनगर हे एक वैभवशाली राज्य होते. संपन्न नगर होते. त्याने विजयनगर फिरून पाहिले. तो मनाशी म्हणाला, 'हे राज्य तर खूप मोठे आहे. खूप श्रीमंत राज्य आहे हे. इथले लोक धनवान दिसतात. राज्याची व्यवस्था चोख दिसते आहे. हा राजा महान असणार. आपण त्याची भेट घेतलीच पाहिजे.'

तेनाली राम याने राजाची भेट घेण्याचा खूप प्रयत्न केला; परंतु त्याचा साधा वेश पाहून पहारेकरी ओरडला,

''अरे, असे शेकडो लोक राजाला भेटण्यासाठी येतात. राजा सगळ्यांना भेटू लागला तर त्यांनी काम कधी करायचे. चल हो मागे.''

दोन दिवस तेनाली राम महाराजांना भेटायचा प्रयत्न करीत होता. त्याला आत सोडले जात नव्हते. तो तिसरे दिवशी पुन्हा आलेला पाहताच द्वारपाल म्हणाला,

''तू पुन्हा आलास ? जा येथून.''

''मला महाराजांना भेटायचे आहे.''

''तू आल्या वाटेने जा नाहीतर तुला अंधार कोठडीत टाकीन.''

तेनाली राम मागे फिरला. एका झाडाखाली बसून त्याने थोडाफार विचार केला. आता आपण द्वारपालाची नजर चुकवूनच आत गेले पाहिजे तरच आपणाला राजाची भेट होईल. मनात त्याने आत घुसण्याचा निर्णय पक्का केला.

चौथ्या दिवशी तेनाली दरवाजाजवळ बाजूला लपून राहिला होता. राजाच्या दरबारी येणारे अनेक प्रतिष्ठित लोक होते. या सर्वांना द्वारपाल चांगले ओळखत होता. त्यामुळे तो त्यांची नेहमीच तपासणी करीत नव्हता. याच गोष्टीचा तेनाली राम याने फायदा घ्यायचे ठरवले. तो त्या इतर प्रतिष्ठित लोकांत घुसला आणि चतुरपणाने आत घुसला.

परंतु तो आत आल्यानंतर तेथील पहारेकऱ्यांना तेनाली रामची लबाडी कळाली. त्यांनी त्याला पकडले. नंतर त्यांनी त्याला राजासमोर हजर केले.

राजाने विचारले, ''काय रे, काय गडबड सुरू होती ?''

पहारेकरी म्हणाला, ''महाराज, हा माणूस चोरून दरबारात घुसला आहे.''

''तो आत घुसलाच कसा ? तुम्ही सारे काय करीत होता ?''

''महाराज, क्षमा करावी; पण हा इसम धूर्तपणे आमची नजर चुकवून आत आला आहे.''

''कोण आहे हा ?''

''कोणीतरी चोर असावा.''

राजाने तेनाली रामला विचारले, ''कोण रे तू ?''

''मी रामकृष्ण.''

''कोणत्या गावाचा तू ?''

''मी तेनालीचा.''

''असं म्हणजे तेनालीचा राम तू. इथं का आलास ?''

''महाराज, मला आपली भेट घ्यायची होती.''


''भेट घ्यायची ही पद्धत ? आत घुसलास तू. तू मोठा अपराध केला आहेस. या अपराधाची शिक्षा ठाऊक आहे तुला ?''

''महाराज शिक्षा मला काय ठाऊक असणार. तुम्हालाच ठाऊक असणार.''

काही लोक हसले. कृष्णदेव म्हणाले, ''याने अपराध केला आहे. त्याची शिक्षा त्याला मिळणारच. जा याला कैद करून अंधार कोठडीत टाका. सकाळी याला ठार करा.''

मग काय ? तेनाली रामची रवानगी अंधार कोठडीत झाली. तेनाली रामला झोप येत नव्हती. उद्या सकाळी आपणाला ठार केले जाणार या विचाराने त्याला ग्रासले होते. तो यातून बाहेर पडण्याचा विचार करू लागला. पहाटे त्याला एक युक्ती सुचली आणि मग थोडा वेळ त्याला डुलकी लागली.

✦



सकाळ झाल्यानंतर राजाचे सैनिक आले. त्यांनी अंधार कोठडीतून तेनाली रामला बाहेर आणले.

त्या सैनिकांबरोबर तेनाली राम खूप दूरवर चालत आला. तेथे एका झाडाजवळ थांबून तो सैनिक म्हणाला, ''तेनाली राम आता मृत्यूला तयार हो.''

''मी तर केव्हापासून तयारच आहे.''

सैनिकाला आश्चर्य वाटले. त्याने विचारले, ''तुला मृत्यूचे भय नाही वाटत?''

''त्यात काय भ्यायचे ? आज मला मृत्यू येईल. उद्या तुम्हाला येईल. मृत्यू तर सर्वांनाच येतो. तो अटळ आहे.''

''म्हणजे तू तयार आहेस तर.''

''होय, परंतु मृत्यूपूर्वी मरणाऱ्याची अंतिम इच्छा पूर्ण करतात ठाऊक आहे ना ?''

''ठाऊक आहे मला.''

''मग माझीसुद्धा अंतिम इच्छा तुम्ही पूर्ण करावी.''

''ठीक आहे. बोल, तुझी अंतिम इच्छा काय आहे ?''

''मला नदीत आंघोळ करायची आहे.''

''समोरच नदी आहे. चल माझ्या समोरच कर आंघोळ.''

तेनाली राम नदीजवळ गेला. तो सैनिक तेथेच त्याच्यावर लक्ष ठेवून होता. तेनाली रामची आंघोळ सुरू असताना तो म्हणाला,

''चल, ये लवकर बाहेर.''

तेनाली राम पाण्याबाहेर आला. सैनिकाने विचारले,

''आता झाली ना तुझी शेवटची इच्छा पूर्ण ?''

''नाही झाली अद्याप.''

''म्हणजे तुझी आणखी काही इच्छा आहे ?''

''होय. मला भूक लागली आहे. भुकेला असताना मी कसे मरू? जेवणाची इच्छा अपुरीच राहील.''

सैनिकाने आपल्या साथीदाराला जेवण आणायला सांगितले.

तेनाली राम पोटभर जेवला. त्याने ढेकर दिला. मग तो म्हणाला, ''जेवण फारच रुचकर होतं.''

''मुद्दामच चांगले जेवण मागवले होते. तुला पुन्हा जेवण मिळणार नाही ना.''

''असे काही नाही.''

''याचा अर्थ काय ?''

''मला एवढंच म्हणाचंय की, कधी काय घडेल हे कोणी सांगू शकत नाही.''

''पण आता तुझा मृत्यू जवळ आला आहे, हे मी ठामपणे सांगू शकतो.''

''जेवण थोडं जास्त झालं. त्यामुळे मला झोप येऊ लागली आहे. मी थोडी झोप घेतो आता.''

असं म्हणून तेनाली राम लगेच तेथे आडवा झाला आणि झोपी गेला. 'त्याला झोपेत कसे मारायचे ?' असा विचार करून तो सैनिक तेनाली राम कधी उठतो याची वाट पाहत बसला.

काही वेळाने तेनाली राम जागा झाला.

तो सैनिक म्हणाला, ''तेनाली राम आता मरायला तयार हो.''

तेनाली राम म्हणाला, ''म्हणजे तुम्ही मला मारले नाही ?''

''तू झोपला होतास ना मग कसे मारणार ?''

''मग आता मी नदीत आंघोळ करतो. देवाची प्रार्थना करीत उभा राहतो. त्यावेळी तू तुझे काम कर.''



''ठीक आहे चल नदीकडे.''

तेनाली राम नदीजवळ आला. तो सैनिक तलवार घेऊन उभा होता. तो पुढे येताच तेनाली राम म्हणाला, ''एवढी घाई का रे बाबा. मला दोन–तीन डुबक्या तरी घेऊ दे. स्वच्छ आंघोळ तरी करतो आधी.''

''ठीक आहे, आवर झटपट.''

तेनाली रामने एक डुबकी मारली. तो पाण्यात बुडून लगेच वर आला. त्याने पुन्हा डुबकी मारली. थोड्या वेळाने तो पुन्हा वर आला. त्याची ही आंघोळ सैनिक पाहत होता. तेनाली रामने तिसरी डुबकी मारण्यासाठी तो नदीच्या पाण्यात बुडला ते लवकर बाहेरच आला नाही.

सैनिक गोंधळला. त्याने पाण्यात भराभरा तलवार मारली पण तेनाली राम दिसला नाही. तेनाली राम कोठे गुप्त झाला हे त्याला कळेना. त्याने स्वत: पाण्यात डुबकी मारून पाहिले; परंतु पाण्यात कोठेही तेनाली राम दिसेना. तो आणखीच गोंधळला. तेवढ्यात त्याचे लक्ष पैलतीरी गेले. तो आश्चर्याने दचकला.

तेनाली राम नदीच्या पाण्यातून पोहत पैलतीरी पोहोचला होता.

त्या सैनिकाने नदीच्या पाण्यात उडी मारली आणि तो पोहत पैलतीरी जाऊ लागला; पण तेवढ्यात तेनाली राम खूप दूर पळून गेला होता. तो सैनिक तेनाली रामचा शोध घेत पळत होता.

तेनाली राम पळत सुटला तो थेट राजाच्या दरबारात हजर झाला. तेनाली रामला पाहताच राजाने विचारले, ''अरे, तू अजून जिवंत आहेस ?''

''होय महाराज.''

‘‘अरे, तुला आमच्या सैनिकांनी मारले कसे नाही ?’’

‘‘ते त्यांनाच ठाऊक महाराज.’’

‘‘अरे, पण तुझे कपडे ओले कसे ?’’

‘‘मी नदीतून आंघोळ करून आलो महाराज.’’

तेवढ्यात त्याचा पाठलाग करीत असलेला सैनिक तेथे आला.

राजाने विचारले, ‘‘काय रे, तू याला मारले का नाहीस ?’’

सैनिक म्हणाला, ‘‘महाराज, हा फार चतूर माणूस आहे. त्याने आपली अंतिम इच्छा पुरी करण्याचे ढोंग करून तो पळाला.’’

‘‘हे कसे घडले ?’’

त्या सैनिकाने घडलेली सारी हकीकत सांगितली.

तेनाली राम म्हणाला, ‘‘महाराज, मी तर काय करणार हो ? मी दोन वेळा डुबकी मारून माझे डोके पाण्याबाहेर काढले होते; पण हा सैनिक नुसती तलवार घेऊन शांत उभा होता. मी त्याला दोन वेळा मारण्याची संधी दिली होती. शेवटी मी विचार केला की, त्याची मला मारण्याची इच्छाच नाही म्हणून मी पाण्यातून पैलतीर गाठला आणि आपल्याकडे आलो.

सर्व दरबारी हसू लागले. राजासुद्धा हसू लागला. काहीजण म्हणाले, ‘‘मोठा गमतीदार माणूस आहे.’’

काहीजण म्हणाले, ‘‘मोठा चतुर आहे हा. म्हणूनच मृत्यूला त्याने चकवले.’’

राजा म्हणाला, ‘‘तेनाली राम, तू चतुर आहेस हे कळाले. चतुरपणा दाखवून तू मृत्यूला टाळलेस असे तुला वाटते. काही काळ तुझा मृत्यू टळला आहे.’’

‘‘याचा अर्थ काय महाराज ?’’

‘‘हुशार आहे ना तू ? याचा अर्थ नाही कळला.’’

‘‘कळाला महाराज, पण आपल्या तोंडून ऐकावा म्हणतो.’’

‘‘मग ऐक.’’

राजाने दोन सैनिकांना बोलवले आणि तो म्हणाला, ‘‘या इसमाला हत्तीच्या पायी द्या. जंगलात घेऊन जा याला.’’

नंतर राजा तेनाली रामला म्हणाला, ‘‘स्वत:ला फार हुशार समजतोस ना तू ? आता वापर तुझी हुशारी आणि वाचव स्वत:ला.’’

राजाचे सैनिक तेनाली रामला घेऊन जंगलाच्या दिशेने चालू लागले. तेनाली राम विचार करीत चालू लागला होता.

✦✦



# मृत्यूच्या तावडीतून सुटका

राजाज्ञा होताच सैनिक तेनाली रामला घेऊन जाऊ लागले. तेनाली राम वरून शांत दिसत होता; पण तो कसल्यातरी विचारात होता. जंगलात मोकळी जागा पाहून ते तेथे थांबले.

एक सैनिक म्हणाला, ''ही जागा ठीक आहे. तुला काय म्हणायचे आहे ?''

''योग्य ठिकाणी आलोय आपण.''

''मग आता तेनाली रामला या झाडाला घट्ट बांधू या आणि आपण खोल खड्डा खणूया.''

''म्हणजे तेनाली रामला आपण जिवंत पुरायचे ?''

''तसे नाही रे. आपल्याला राजाचा हुकूम आहे की या इसमाला हत्तीच्या पायी द्यावे. आपण याला गळ्यापर्यंत पुरू या.''

''आणि मग काय करायचे ?''

''आपण हत्ती घेऊन येऊ आणि सोडू त्या हत्तीला रिकामा. तो याला तुडवेल. आपले काम होऊन जाईल.''

''ठीक आहे. आण ती कुदळ. मी खणायला सुरुवात करतो.''

''अरे, पहिल्यांदा या तेनाली रामला घट्ट झाडाला बांधूया. हा चतुर आहे.''

''होय ते खरं आहे. आपण इकडे खड्डा खणायचो त्याच्यासाठी आणि तो जायचा पळून.''

तेनाली रामने हसत विचारले, ''काय रे मी खरंच पळून गेलो तर काय होईल ?''

पहिला सैनिक उत्तरला, ''तसे तू करू शकणार नाहीस. तसे झाले तर राजा आम्हाला गळ्यापर्यंत खड्ड्यात पुरेल आणि हत्तीला सोडेल आमच्याकडे.''

तेनाली राम हसू लागला. ते दोन्ही सैनिक त्याच्याजवळ आले. त्यांनी अगोदरच त्याचे हात–पाय बांधलेले होते. त्याचे पाय सोडून ते त्याला एका मोठ्या झाडाजवळ घेऊन आले आणि त्यांनी तेनाली रामला झाडाला दोरीच्या सहाय्याने घट्ट बांधले.

नंतर ते सैनिक कुदळ घेऊन खड्डा खणू लागले. बराच वेळ त्यांचे काम सुरू होते.

तेनाली राम म्हणाला, ''अरे खूप दमलाय तुम्ही थोडी विश्रांती घ्या. मग खड्डा खणा. मी काय पळून जातोय की काय ?''

पहिला सैनिक म्हणाला, ''तुझा काही नेम नाही. आम्हाला आमचे काम लवकर पूर्ण करायचे आहे.''

थोड्या वेळाने खड्डा खणून झाला होता. त्या दोघांनी तेनाली रामला त्या खड्ड्यात गळ्यापर्यंत पुरले. पहिला सैनिक म्हणाला, ''चल आता हत्तीला घेऊन येऊ.''

''हा निसटून नाही ना जाणार ?''

''कसा जाईल ? गळ्यापर्यंत पुरलं आहे आपण त्याला. चल लवकर.''

ते दोघे निघून गेले. तेनाली राम पुन्हा तेथून सुटण्याचा विचार करू लागला. तो घाबरला नव्हता. कठीण प्रसंगीसुद्धा डोकं शांत ठेवून तो विचार करीत होता.

काही वेळाने त्या जंगलातून आपल्या पाठीवर एक मोठे गाठोडे घेऊन एक मनुष्य जाताना तेनाली राम याने पाहिला. त्याने हाक मारली, ''अहो पाव्हणं या हिकडं.''

तो मनुष्य त्याच्याजवळ गेला. तेनाली रामने विचारले,

''कोण तुम्ही ? कोठे निघालाय एवढ्या घाईने ?''

''मी धोबी आहे. राजमहालाकडे निघालोय.''

''गाठोड्यात काय आहे ?''

''धुतलेले कपडे आहेत. ते महालात द्यायला निघालो आहे मी.''

''लोकांना निर्मळ करता तुम्ही. तुम्ही पुण्यवान आहात.''

''पण का हो, तुम्ही कोण ?''

''मी तुमच्यासारखाच एक धोबी आहे.''

''काय सांगता ? मला कधी दिसला नाहीत.''

''मी दूरच्या गावी असतो.''

''अहो, मग असे गळ्यापर्यंत कोणी पुरले आहे तुम्हाला ?''

''मला कशाला कोण पुरेल ? मी स्वत:च पुरून घेतले आहे.''

''वेड लागलंय काय तुम्हाला ? असं का केलेत तुम्ही ?''

''माझ्या आजारावर तो उपाय आहे.''

''कसला आजार झालाय तुला ?''

''काय सांगू बाबा. माझ्या पाठीवर कुबड आलं होतं. आपलं काम हे पाठीवर गाठोडी घेऊन जाण्याचं. त्यामुळे मला असे कुबड आले होते.''